Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/परीक्षा/ 1771
दिनांक :- 28/08/2024

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका आणि तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख संबंधित वितरण केंद्रावर सोमवार दि.02/09/2024 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 पर्यंत हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर दिवशी आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर सर्व गुणपत्रिका आपल्याच माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झालेस दि.06/09/2024 अखेर मंडळ कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

जुलै-ऑगस्ट 2024 मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांचे आपल्या माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात सोमवार दि.02/09/2024 रोजी दुपारी 3.00 वाजता वाटप करण्यात यावे.

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**